| MHKO050001932012 | **नियमित दिवाणी दावा क्र. ३२७/२०१२ मधील निशाण ८८ वरील आदेश**<br>**संदीप सितराम पाटील**<br>**वि.**<br>**सिताराम गोपाळ पाटील** |
| --- | --- |

**१.** वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी यांचे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ५ बँकेचा दावा मिळकतीशी कोणताही कायदेशीर हक्क संबंध नव्हता व नाही तसेच प्रतिवादी क्र. ५ बॅकेकडुन वादी यांनी कोणतेही कर्ज घेतलेले नव्हते. वादी यांचे पुढे असेही कथन आहे की, दावा मिळकतीमधील असणारा हक्क व हिस्सा डावलण्याच्या हेतुने दावा मिळतीवर प्रतिवादी क्र. ५ यांनी बेकायदेशीर रित्या वसुलीची कार्यवाही सुरु ठेवली आहे. त्यामुळे वादी यांनी १०ड-१, मध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेची विनंती वादी यांनी केली आहे.

**२.** प्रतिवादी क्र. ५ यांनी सदर अर्जास नि. ९० प्रमाणे म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज नाकारला आहे. प्रतिवादी क्र. ५ यांचे असे कथन आहे की, सदरची दुरुस्ती मंजुर केली तर दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. वादी क्र. १ ते ३ व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी संगमताने प्रतिवादी क्र. ५ बॅकेचे कर्ज बुडवण्याच्या दुष्ट हेतुने व न्यायनिर्णयास विलंब करण्याकरिता सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ५ पुढे असे ही कथन करतात की, प्रतिवादी क्र. १ हे प्रतिवादी क्र. ५ याचे कर्जदार असुन त्यांनी वादी व इतर प्रतिवादी यांच्या कुटुंबासाठी प्रतिवादी क्र. ५ बॅकेकडुन घेतलेल्या कर्जाच्या वसुली करीता कायदेशिर कार्यवाही केली आहे. प्रतिवादी क्र. ५ यांचे घेतलेले कर्ज बुडवण्याकरिता

प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. तरी तो अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

प्रतिवादी क्र. १ यानी नि. ९१ कडे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. १ यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ५ कडुन कर्ज घेतलेले नव्हते तसेच प्रतिवादी क्र. ५ यांचा दावा मिळकतीशी काहीही अधिकार कायदेशीर हक्क संबध नाही. प्रतिवादी क्र. १ पुढे असे ही कथन करतो की, २००८ च्या शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे त्याचे कर्ज माफ झाले परंतु प्रतिवादी क्र. ५ यांनी राजकीय दबावापोटी शेती कर्ज माफ केले नाही. व आर्थिक घोटाळा केला आणि त्याचा तोटा भरुन काढणयासाठी खोटी वसुली करित आहेत.

दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**३.** प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा वाटणी व कायम मनाई हुकुमाकरिता दाखल केल्याचे दिसून येते. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वादी यांनी त्यांचा येणारा १/५ हिस्सा प्रतिवादी क्र. ५ यांना जप्त विक्री करता येणार नाही. असे हक्कज्ञापन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादी यांनी वाद पत्र परिचित क्र. ४ मध्ये स्पष्टपणे लिहिलेले आहे की प्रतिवादी क्र. १ यानी प्रतिवादी क्र. ५ बॅकेकडून कोणतीही कायदेशीर गरज नसताना वादीच्या संमतीशिवाय कर्ज काढलेले आहे. यावरुन ही बाब स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. १ यानी प्रतिवादी क्र. ५ यांच्याकडुन कर्ज काढलेले आहे व प्रतिवादी क्र. ५ यांनी दावा मिळकत जप्त व विक्री करणेकरिता कार्यवाही सुरु केलेली आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ५ यांच्या कडुन कर्ज घेतलेले आहे. ज्यावेळी प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ५ यांच्या कडुन कर्ज घेतले आहे. त्यावेळी ते कर्ज जर प्रतिवादी क्र. १ यांनी परतफेड केली नाही तर प्रतिवादी क्र. ५ यांना कर्ज वसुली करण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे. त्यामुळे वादी यांना प्रस्तुतच्या अर्जामध्ये मागितलेली दुरुस्तीबाबत हक्कज्ञापन मागता येणार नाही. जर प्रस्तुतची दुरुस्ती मंजुर केली

तर प्रतिवादी क्र. ५ यांच्या कायदेशिर हक्कावर बाधा येऊ शकते तसेच दाव्याचे स्वरुप बदलते आणि दाव्याच्या निकालासाठी उशिर लागु शकतो. याशिवाय प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केला तर वादी यांच्या दाव्यावर कोणताही विपरित परिणाम होणार नाही. त्यामुळे वादी यांनी मागितलेली दुरुस्ती प्रस्तुतच्या दाव्याचा निकाल देण्याकरिता आवश्यक व महत्वाची नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज नि. ८८ नामंजूर करण्यात येतो.

सही/-

**(संजय दि. वानखेडे)**
**५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**इचलकरंजी.**

**इचलकरंजी**
**दिनांक–१९/०१/२०२४**